# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

**(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)**

## (आस्थापना विभाग)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३११७ email:-establishment.section@unigug.ac.in

जा.क्र. गो.वि./आस्था./ १३२९ /२०२४ दि. ०९/०५/२०२४

## परिपत्रक

**संदर्भ:- १. विद्यापीठ परिपत्रक क्र. गों.वि./आस्था./४१४१/२०२३ दिनांक २२/१२/२०२३.**
**२. विद्यापीठ परिपत्रक क्र. गों.वि./आस्था./१३७/२०२४ दिनांक ११/०१/२०२४.**
**३. विद्यापीठ परिपत्रक क्र. गों.वि./आस्था./२६५/२०२४ दिनांक २४/०१/२०२४**

उपरोक्त परिपत्रकांच्या अनुषंगाने विद्यापीठ आस्थापनेवरील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी तसेच सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर आव्हान, २०२३ च्या पार्श्वभुमीवर सार्वजनिक व साप्ताहिक सुट्या रद्द करुन नियमितपणे कार्यालय सुरु ठेवण्यात आले होते. त्यामुळे संदर्भ क्र. २ च्या परिपत्रकान्वये सार्वजनिक व साप्ताहिक सुट्या ऐवजी पर्यायी रजा मंजूर करुन दिनांक १५/०१/२०२४, दिनांक २०/०१/२०२४ व दिनांक २९/०१/२०२४ रोजी विद्यापीठ आस्थापनेवरील कार्यालयीन कामकाज बंद राहील, याबाबतचे परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते.

तथापि काही अपरिहार्य कारणास्तव दिनांक २९/०१/२०२४ रोजी निश्चित करण्यात आलेली पर्यायी रजा संदर्भ क्र. ३ च्या परिपत्रकान्वये रद्द करुन सदर दिवशी नियमितपणे कार्यालय सुरु ठेवण्यात आले होते.

त्याअनुषंगाने मा. कुलगुरु महोदयांनी दि. १०/०५/२०२४ रोजी पर्यायी रजा मंजूर केलेली असल्याने दि. १०/०५/२०२४ रोजी विद्यापीठ आस्थापनेवरील कार्यालयीन कामकाज बंद राहील. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**मा. कुलगुरु महोदयांच्या मान्यतेने**

**(डॉ. अनिल हिरेखण)**
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

***प्रतिलिपी माहितीकरीता सादर:-***

*१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.*
*२. मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.*
*३. सर्व प्रशासकीय व शैक्षणिक विभागांचे विभागप्रमुख / कार्यालय प्रमुख यांना निर्देश देण्यात येते की, आपणासह आपल्या अधिनस्त सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना सदर परिपत्रकाबाबत अवगत करावे.*
*४. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कळविण्यात येते की, दिनांक १०/०५/२०२४ रोजी विद्यापीठ कामकाज बंद राहील याची कृपया नोंद घ्यावी.*
*५. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.*